# डॉ. बापूजी साळुंखे एक सारसंग्रहात्मक तत्त्ववेत्ता

**प्राचार्य, डॉ. सौ. एस. डी. देशमुख**
कॉलेज ऑफ एज्युकेशन, उस्मानाबाद.

जन्माला आलेले प्रत्येक मुल अस म्हणतात ते ट्या ट्या sss रडत असतो. तेव्हा ते जगाला प्रश्न विचारत की कोह sssम् ? कोह sssम् ? मी कोण आहे ? मी जन्माला येण्याच प्रयोजन काय ? मला वाटत बापूजी जेव्हा जन्माला आले तेव्हा सुध्दा त्यांनी स्वत: हा आणि जगाला हा प्रश्न विचारला असावा ! मी कोण आहे ? माझ्या जीवनाचा प्रयोजन काय ? परंतू सामान्य माणसा प्रमाणे त्यांनी ह्या प्रश्नाचा उत्तर शोधतच आयुष्य काढल नाही. तर या प्रश्नांची स्पष्ट उत्तर बापूजींना ज्ञात होती. मी एक तत्त्ववेत्ता आहे, की जो सर्व तत्त्ववेत्यांच्या तत्त्वज्ञानातील सार घेऊन आपली जीवनाची वाटचाल करणार आहे. माझा विचार शिक्षण असणार आहे माझा कर्म शिक्षण असणार आहे. हे माझ जीवन शिक्षणमय असणार आहे. हे सर्व प्रत्यक्षात आणणे हे माझ्या जीवनाच प्रयोजन असणार आहे." इतक स्पष्ट उत्तर कदाचित कोण्या पामराला माहित असेल का ? त्यामुळेच तर बापूजी सामान्यातील असामान्य म्हणून कर्तृत्ववान तपस्व्या सारखी तपस्या करत राहीले आणि त्या तपस्येतच कोहमच उत्तर होती."

ग्रीक तत्त्वेत्यांच्या इतिहासात प्रोटेस्टंट पंथी लोक Man is measure of all things असे वचन मानत असत. सॉक्रेटिस नावाच्या तत्त्ववेत्त्यांने या प्रोटेस्टंटी पंथीयांना शह दिला आणि तो म्हणाला कोणताही मनुष्य हा प्रमाण नव्हे ! तर जो मनुष्य ज्ञानी आहे तोच प्रमाण मानला गेला पाहिजे आणि ज्ञानी मनुष्य हा सद्‌गुणी असला पाहिजे म्हणून Knowledge is Vertue "ज्ञान हाच सद्‌गुण " बापूजींच्या बाबतीत हे आदर्शवादाच वचन तंतोतंत लागु पडते. कोणता मनुष्य ? सद्‌गुणी मनुष्य ! बापूजी ज्ञानी होते कारण ते सद्‌गुणी होते. म्हणून ते सर्व गोष्टीचे प्रमाण होते. आणि आहेत. ज्ञानी मनुष्य हा सद्‌गुणी असतोच नव्हे असलाच पाहिजे. बापूजी सुध्दा सद्‌गुणी आणि म्हणून ज्ञानी आणि म्हणूनच प्रमाण सुध्दा ! प्रमाण मानव आशा किती तरी गोष्टी बापूजींनी आपल्या आयुष्यात केल्या. बापूजींचे इतिहास संशोधन, बापूजींनी कर्मवीरांसाठी केलेली पायपीट, बापूजी रुकडी येथे जाऊन उभी केलेली शाळा, इस्लामपूरच्या श्रीराम शिक्षण प्रसारक मंडळाच्या माध्यमातून उघडलेल्या 11 नविन शाळा, श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची निर्मिती, संस्थेची घटना, संस्था प्रार्थना, आशा प्रमाण गोष्टीची यादी संपणार नाही. आदर्शवाद असे सांगतो हे जग कल्पनांचे जग आहे आणि कल्पना ह्या आदर्श असतात. बापूजींनी ज्या कल्पना केल्या त्या प्रत्यक्षात उत्तरवल्या बापूंजीच्या कल्पना ह्या आदर्शवादीच आहेत. तळागाळातल्या बालकांला शिक्षण मिळाले पाहिजे, शिक्षण खेडया पाडया, वाडया वस्त्यांवर पोहचला पाहिजे ही एक जरी बापूंजीची कल्पना पाहिली तर ती आदर्श तर आहेच पण ती फक्त कल्पना नव्हे तर Ideal सुध्दा Real सुध्दा आहे बापूंजीच्या कल्पनांच जग हे आदर्शवादी होते. बापूंजीच्य कल्पनांच जग आदर्शाप्रत वास्तव सुध्दा होते. आणि या कल्पनांना प्रत्यक्षात आणणे हाचा बापूजींच्या जीवनाचा ध्येयवाद होता, ध्यास होता. आदर्शवादाच्या प्रणेत्यांनी म्हणजेच सॉक्रेटिस प्लेटो ॲरिस्टाटल सारख्या तत्त्ववेत्यांनी आपले विचार कल्पना जगासमोर मांडण्यासाठी, जगाला, देशाला, समाजाला शहाण करुन टाकण्यासाठी ॲकॅडमीची स्थापनणा केली. कारण त्यांनाही माहित होत ॲकडमी मधूनच आपण हे कार्य चालू ठेवू शकतो, शिक्षण हाच मार्ग आहे, त्याच प्रमाणे बापूजींनी सुध्दा आदर्शवादीच शिक्षण संस्थेची स्थापणा केली. बापूजीनी या संस्थेच्या माध्यमातून इतक प्रंचड काम केल आहे की आज म्हणाव वाटत Bapuji Is Education and Education is Bapuji.

बापूजींवर भारतीय अध्यात्मवादाचा प्रचंड पगडा होता. नित्य नियम, उपासना, पूजा अर्चा, ध्यान, धारणा मनन, चितंन, व्यासंग, पाठान्तर, निदिध्यास या सर्वांचा परिपाक म्हणजे बापूजी लहान असताना आई वारली. बापूजी वडीलांबरोबर देवपूजा करत. शाळेला उशीर होतो हे कळत होत पण देवपूजा सुटन नव्हती. देवावर प्रचंड श्रध्दा, उपासनेच अंगात सामर्थ्य, ध्यानात मन एकाग्र करण्याची क्षमता, दररोज नित्य नियम आणि निदिध्यासाच कौशल्य, मनन चितंनाने मनाला धैर्य, शांती, समाधान असे श्रध्देने पवित्र सातत्यपूर्ण जीवन म्हणजे बापूजीच जीवन, एकदा बापूजी ध्यानस्थ बसले सकाळी बसलेले बापूजी सायकाळ झाली तरी ध्यानस्थ ! केवढी ही मानसिक शक्ती आणि मानसिक शिस्त ! ज्या वयात खोडया करायच्या, उनाडक्या करायच्या, मित्राबरोबर मनसोक्त भटकायच, हुदंडायच, त्या वयात ध्यान धारणा, पाठांतर, पूजा अर्चा, मनन चिंतन ! हे निश्‍चितच सामान्य बालकाच लक्षण नव्हत. बापूजींना पहायला त्यांचे आई वडील जीवंत असेत तर त्यांच मन खरच किती हारकूण मोहरुन गेले असत ! भरुण आल असत ! केवढ गुणाच बाळ ! शांत, मृदू स्वभाव, विनयशीलता, कष्टाची तयारी, अगदी दैवी गुणांचे बाळ ! खरच त्या माऊलीच आणि पित्याच मन पांग फेडलयागत नतमस्तक नक्कीच झाल असत ! नव्हे आजही ते नक्कीच होत असणार ! फक्त ते आपणास दिसत नाही.

ज्या वयात मिसरुडाला पीळ देत गावात शड् ठोकायचे, तरुणांमध्ये तरुणाईच्या मस्तीत रमूण जायच त्या वयात शाळा काढाव्या, माधुकरी मागावी, शिक्षण पूर्ण करण्याचा घ्यस ठेवावा. ज्ञान संपादनाची आस बाळगावी, शिक्षक होण्याच स्वप्न बाळगवाव, इतिहास संशोधक व्हाव, राजगुरु म्हणून सांडूर च्या संस्थानात काम कराव, म. गांधी स्वप्नात यावे, राष्ट्रसेवेला आपली गरज आहे अस वाटाव, स्वातंत्र समरात उडी घ्यावी, भूमीगत व्हाव, आपल घर वाऱ्यावर सोडाव, नव्हे त्यावर तुळशीपत्र ठेवाव, जन्माला आलेल्या बाळाला पाहायला मिळू नये, बाळंतिण बायकोला कसलीच मदत होऊ नये. स्वातंत्र्य चळवळीचा सातारा जिल्ह्याचा इतिहास लिहावा ! छे ! ही तरुणाईची काम ? आज आम्हाला हे खर वाटत का ? खरच यावर आमच्या आजच्या तरुणाईचा विश्वास बसू शकतो का ? मेहनत, जिद्द चिकाटी, बलीदान, त्याग, उपासना, राष्ट्रभक्ती, देशप्रेम, समाजसेवाव्रत शिक्षणाविषयी कळवळ, शिक्षण प्रसाराबद्दल विश्वास, सतत भटकंती, पायी प्रवास, गावोगावी भेटी, लोकांशी सभा संवाद, शिक्षणाच्या महतीच गाण, लोकाना पटवणे, पून्हा पून्हा भेटणे, दऱ्या डोंगर चिखल, ऊन, पाऊस, वारा, खड्डे, पायवाट यांची तमा न बाळगणे किती म्हणून सांगाव ! हेच तर सर्व बापूजींच तरुणपण ! आज आमच्या तरुणांना सर्व रेडीमेड कल्चर मध्ये सर्व तयार मिळत आहे. त्यांना बापूजीच्या तरुणपणातील जीवनपटाची कहाणी काय माहित ? खरच मला वाटत त्यासाठी तर बापूजी पूढच्या पिढीला समजले पाहिजेत. ते समजावून सांगण हे आमच कर्तव्य आहे.

सा विद्या या विमुक्त ये ! दुःख दारिद्रय, अनिष्ठ प्रथा, रुठी, परंपरा लोभ क्रोध, मोह, मद, मत्सर, अंहकार या पासून जी मुक्त करते तीच विद्या होय ! ज्ञान होय ! उपनिषदांचा अभ्यास बापूजी करत होते. त्यामुळे त्यांना ज्ञानाचा विद्येचा, शिक्षणाचा उपनिषदातील "या विद्या या विमुक्तये" त्याचा अर्थ समजला होता, भावला होता || विद्या विमोक्षाय विभाती केवला ! || किंवा || ज्ञानस्य मनुजस्थ तृतीयस्थ नेत्रम || आशा ज्ञानाच्या वचनाच अमृत बापूजी कोळून पिले होते. आद्य शंकराचार्य म्हणतात. ज्ञान म्हणजे || सत्यान्वेपण || "भ्रमनिरास !" बापूजीनी सत्याची कास धरली होती.

* अलैकीक जगात मुक्ती नंतर स्थान मिळवायचे असेल तर ह्या लैकिक जगाचा भ्रमनिरास केला पाहिजे. म्हणून बापूजींनी कधी सत्ता संपत्ती, ऐश्वर्य, लोभ लालसा मनात बाळगली नाही. सतत सत्याचीच कास धरली " ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार" हे बिद्र अंगीकारले. डहाणू तालुक्यातील डोंगरदऱ्या पायाखाली घालून अदिवासीची पन्नास मुले गोळा करुन तेथे आश्रमशाळा सुरुवात केली. अदिवासींची अवस्था पाहून बापूजीचे ह्दय तिळ तिळ तुटू लागले. आणि गिरीजनांची सेवा करण्याचा, त्यांना अज्ञानातून मुक्त करण्याचा त्यांनी निश्चय केला. सावकाराच्या कर्जातून मुक्त होण्यासाठी, सावकाराच्या विरोधाला न जुमानता तिथेच एक लाखाची इमारत उभी केली पोटच्या लेकाराप्रमाणे मायेने अदिवासींच्या लेकरांना जेऊ घातले. बापूजींचा श्रमप्रतिष्ठेवर प्रचंड विश्वासू होता. मातीत हात घातल्या शिवाय आणि घामाच्या धारा मातीत मिसल्या शिवाय शिक्षण डोक्यात शिरत नाही असे त्यांचे तत्त्वज्ञान होते. कार्यवादी बापूजींनी हाताची, मनाची आणि ह्दयाची सांगड घातली. म. गांधीच्या मन, मेंदु मनगट यांचा विकास म्हणजे शिक्षण हे प्रत्यक्षात करुन दाखवले. विवेकानंद महाविद्यालयातील 70 विद्यार्थ्यांना बापूजींनी प्राध्यापकासह आशागडला नेले. NSS च्या माध्यमातून विहिर खोदली. 15 एकर जमीन नांगरणीखाली आणली. विहिरीला पाणी लागले. बापूजींचे तत्त्वज्ञान हस्तीदंती मनोऱ्यातून पंडिती पोपट पंची बोलत नाही. तर घामाच्या धारांनी ते फूलून निघते. Learning by doing कमवा आणि शिका ! अनुभवातून शिक्षण ! कृतीतून शिक्षण ! स्वावलंबी शिक्षण, आनंददायी शिक्षण, प्रकल्पातून शिक्षण, भेटीतून, प्रयोगातून शिक्षण अशा कितीतरी शिक्षणातील प्रयोगाची सुरुवात बापूजीनी केलेली दिसून येते. Real Life Like Activities शिक्षण म्हणजे जीवन, जीवन साधना म्हणजे शिक्षण, श्रमप्रतिष्ठा म्हणजे शिक्षण, संघर्ष म्हणजे शिक्षण ! शुध्द ज्ञान, ज्ञानासाठी ज्ञान शब्दज्ञान हे तत्त्व बापूजींना मान्य नाही. बापूजीच्या मते शिक्षण म्हणजे व्यवहारिक कौशल्यांची वाढ ! कृतीतून विचार आणि बुध्दिचा विकास होतो. कृती - विचार - अनुभव - ज्ञान - अधिक चांगली कृती - अधिक चांगले ज्ञान - असा क्रम बापूजींचा होता. या विचाराला त्यांनी आपल्या कार्यातून सिध्द केले. हातकलंगलेला शाळा, वसतीगृहाचे बांधकाम मुलाकडून करुन घेतले. 10 एकर शेती वहिवाटीस आणली. प्रत्येक वेळी नवे प्रयोग केले. अनुभव घेतला आणि पुन्हा अधिकाधिक चांगला अनुभव सिध्द करत राहिले. व्यक्ति हा समाजनिरपेक्षा जीवन जगूच शकत नाही म्हणून बापूजींचे वैयक्ति ध्येय हेच सामाजिक ध्येय होते. एकुणच मानवी शक्तींना वळण लावून त्यांना समाजकार्यासाठी सक्षम करणे हे कार्यवादंयाचे सर्वश्रेष्ठ ध्येय बापूजीनी अंगी कारले होते म्हणून तर ते श्रेष्ठ कर्मयोगी ठरतात.

स्वामी विवेकानंद म्हणतात Education is the manifestation of the perfection Already in man दैवी शक्ती आणि पूर्णत्त्व या वेगळया नाहीत. प्रत्येक प्राणीमात्रात दैवत्त्वाचा अंश आहे. तेच पूर्णत्त्व ! त्याचा पूर्णत्त्वाकडे जाणे म्हणजे शिक्षण ! स्वामी विवेकानंद या महान तत्त्ववेत्याच्या तर बापूजी प्रेमातच पडले होते. " अंत: करणातील आध्यात्मिक शक्ती जागृत झाल्याशिवाय व्यक्तिला पूर्णत्व प्राप्त होत नाही व व्यक्तीमध्ये सुप्त स्वरुपात असलेल्या पूर्णत्त्वाचा विकास केल्याशिवाय त्याच्यातील दैवी अंश प्रकट होत नाही" या विवेकानंदाच्या विचारा वर बापूजींची श्रध्दा होती. बापूजींची धर्मावर श्रध्दा होती विश्वास होता. म्हणूनच तर प्रत्येकातील दैवी अंशाचा विकास हाच त्याचा पूर्णत्त्वाचा विकास होय हे बापूजींना चांगले समजले होते. सत्य, शील, प्रामाणिकता, त्याग पिळवणूकीस आळा, मानव्याचे अधिष्ठान, ईश तत्त्वदर्शन असे ते

आपल्या प्रार्थनेच्या रचनेत म्हणतात. दैवी अंश म्हणजेच सत्यवादी शीलवान, प्रामाणिक आणि अन्यायाविरुध्द आवाज उठवणारा पिळवणूक न करणारा असा मानवतावादी सुंसंस्कृत माणूस घडवणे हेच खरे शिक्षण ! शिक्षण म्हणजे जीवनाची घडण, माणूसकीचा विकास, चारित्र्या संवर्धन आण सत्कल्पनांचे आत्मीकरण ! शिक्षणातून चारित्र निर्मिती कशी होईल . तर सतत सद्‌विचारांचे संस्कार मनावर होत गेले पाहिजेत, त्यानुसार कृती केली गेली पाहिजे आणि त्यातूनच दैनंदिन व्यवहारातील सवयी दृढ झाल्या पाहिजेत. "चारित्र्य म्हणजेच सवयींची पुन:रावृत्ती आणि या पुन:रावृत्तीमधूनच चारित्र्याची निर्मिती होते. चारित्र्यामध्ये दुसरा अंतर्भूत घटक म्हणजे विशाल व्यापक सहानुभूती. मानवा मानवातील प्रेम, इतरांच्य सुख दु: खा बद्दल आत्मीयता असने, केवळ बौध्दिक विचार म्हणजे शिक्षण नव्हे ! किंवा बौध्दिक विकास म्हणजे विकास नव्हे ! त्यामुळे उलट स्वार्य व स्पर्धा वृत्तीचा विकास होतो. अंत : करणातील मानवतेचा विकास हे खरे शिक्षण ! बुध्दिपेक्षा शुध्द अंत: करणाची प्रेरणाच माणसाला खरे मार्गदर्शन करु शकते. या विचारांवर बापूजींचा विश्वास होता. "सत्य, शील, प्रामाणिकपणा, चारित्र्य आणि पिळवणूक प्रवृत्तीस आळा किंवा प्रतिबंध्द या तत्त्वाचे ज्ञान प्रत्येक विद्यार्थ्याला मिळाले तर चारित्र्य निर्मिती सहज होऊ शकते. या सर्वाचे आचरण म्हणजेच सुसंस्कार ! सुसंस्कारी मनुष्य बनविणे हेच शिक्षणाचे एकमेव उद्दिष्ट ! उच्चार पूर्ण कृती व खंबीर नेतृत्त्व यामुळे श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था खंबीर बनली आहे.

बापूजींनी स्वत: त्याग केला. आपल्या वाडवडीलांची असणारी जमिन पैसे सर्व या यज्ञामध्ये निस्पृहपणे होम केले. स्वत: संस्थाचालक असताना उपशिक्षकाचे वेतनावर घर चालवून ज्ञानाचा यज्ञ अहोरात्र चालू ठेवला. बापूजी आपल्या एका मुलाखती मध्ये म्हणतात. "लहापणापासूनच समाजसेवा करावी असा विचार मनांत होता. त्यासाठी मला दोन मार्ग दिसायचे एक समाज सेवेचा आणि दुसरा वकीलीचा. आडल्या नडल्यांना मार्गदर्शन करावे. पण आज संस्था चालक झालो हे काय कमी झाले ? ध्येयाने वेडा झालेला माणूस स्वत:च्या मुलाबाळांची काळजी न करणारा पण दुसऱ्याची मुले शाळेत जावीत म्हणून त्यांचे आतड तिळ तिळ तुटत होते. पंचक्रोशीतील सर्व मुले शिकून मोठी झाली पाहिजेत या साठी अट्टहास, आणि ह्या अट्टहासापोटीच श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची निर्मिती करण्यात आली. म्हणजेच बापूजींनी तळागाळातल्या दीनदुबळयांना, पिडितांना अंत: करणातील पूर्णत्त्वाचा अविषकार करण्याची संधी उपलब्ध करुन दिली. निसर्गवादी जीन जॅकस ससोचे विचार स्वामी विवेकानंदाना पटले होते. तेच बापूजींनी अंगीकाले एखाद्या रोपट्याचा जसा आपोआप विकास होतो तसाच मुलांचाही विकास होतो. शिक्षकाचे काम एवढेच कि त्याच्या विकासाच्या मार्गातील नैसर्गिक अडथळे दूर करणे, आणि त्यांच्या शक्तींना जागृती आणणे योग्य खतपाणी घालणे. प्रकाश व हवा पाणी यांची सोय करणे, संभोवताली कुंपण घालणे, म्हणजे रोपटी सूरक्षित राहतात व त्यांचा योग्य प्रकारे विकास होतो. तसेच मुलाचेही आहे. म्हणून बालकाच्या विकासाला योग्य परिस्थिती निर्माण करुन देणे हेच शिक्षकाचे कार्य होय. हेच कार्य बापूजींनी 1960 च्या मे च्या सुट्टीत केलेले उदाहरण मला नमुद करावे वाटते. शाळा महाविद्यालयांना सुट्टया होत्या पण ज्या मुलांना घर नाही, घर आहे पण घरी खायला काही मिळत नाही. वसतिगृहात कायम वास्तव करणारी मुले कधीही गावाकडे घरी जातच नव्हती. दिवाळीच्या सुट्टीत बापूजी सर्व मुलांना दिवाळीत अंघोळ घालत. त्याच्या बरोबर जेवण घेत. पूर्ण सणाचे दिवस त्यांच्या बरोबर घालवत. सर्वांना प्रेमाची दिवाळी देत. मुलांना आपण गुन्हेगार आहोत. समाज बहिस्कृत आहोत याचा विसर पडत होता. ती मनातून आनंदित होत होती. आपले आई वडील भेटल्याचा आनंद त्यांना बापूजी मिळवून देत. त्याच मुलांन कडून बापूजी गीतेचा 16 आणि 18 अध्याय तोंडपाठ करुन घेतात ! बाल गुन्हेगार म्हणून ज्यांना रिमांडहोम मध्ये टाकले त्यांच्या जिभेवर गीतेचे श्लोक बसवले. तेच बापूजी याचा मुलांना खडे बोल सुनावतात. याच बालकांनी बापूजींचा आठ्वणाव्या वाढदिवसा निमित्त बापूजीना कपडे भेट म्हणून दिले होते. केवढे हे परिवर्तन ! आणि कृतज्ञतेची, कृथार्थतेचे भावना ! माणसे सत्ता संपत्ती अधिकाराने किंवा परंपरेने मोठी होत नाहीत तर सेवा, त्याग कष्ट, जाणीवेतून मोठी होतात. म्हणूनच ते ध्येयवादी आदर्श लोकसेवक ठरतात.

लोकंसेवेतचे हे शेक्षणिक कार्य करत असताना त्यांना खूप त्रास झाला. परंतू ते कधिच डगमगले नाहीत. एकच ध्येय, जिद्द चिकाटी या त्रैयी अवस्थेत त्यांनी आपले कार्य पुढे चालू ठेवले. समाजात शिक्षणाचा नंदादीप प्रज्वलीत ठेवला. समाधद्रोह्यांना ठणकावून सांगितले की ही शिक्षण मंदिर सुसंस्कारासाठी उभी करण्यात आली आहेत. या संस्कार केंद्राचे दरवाजे सर्वांना खुले आहेत. इथे दांभिकता, जातपात, लिंगभेद अगर व्यक्तिपूजा नाही. आणि अशा कणखर सडेतोड बाणेदार कृत्तीने लढणाऱ्या शिक्षण महर्षीच्या बापूजींच्या कार्याची सावली दूरवर परसरी की अखंड महाराष्ट्रात ज्ञानगंगेचे पवित्र कार्य एका दिलाने होऊ लागले. बहुजन समाजातील नवी पिढी निर्माण करण्याकरिता शिस्त बध्द् योजना भरभक्कम पायांवर उभारण्याचे कार्य बापूजीनी केले. सुसंस्कारित बालके ही राष्ट्राची खरी संपत्ती आहेत असे ते म्हणतात. "प्रभावी शिक्षण हे सुलभतेने गरीब विद्यार्थ्याच्या आटोक्यात आणून देणे, ही एक फार मोठी गरज आहे ?" असे बापूजींना वाटते.

"वयाची साठ वर्षे पूर्ण होत असताना मी कृतार्य आहे, तृप्त आहे. कारण संस्थेच्या उभारणीत मी आणि माझ्या कुंटुबाने आयुष्यातील प्रत्येक क्षण खर्च केला आहे. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था ही एका शिक्षकाची शिक्षण संस्था आहे. ती शिक्षकांनी चालवली आहे. पावित्र्यांच्या पवित्र पायावर ती उभी आहे.

जीवनातील अनेक संघर्षानां तोंड देता देता मनुष्य कणखर होतो आणि शिक्षणने माणूस सुसंस्कारी होतो. आणि सुसंस्कारी माणूस हा परमेश्वराचा अंश आहे. या श्रध्येवरच "ज्ञान विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार" हा मंत्र सर्व कार्यकर्त्यांना मी दिला. अनेक प्रकारची निंदा मला सहन करावी लागली. पण मी डगमगलो नाही. भ्रष्ट माणसाला त्याच ठिकाणी मार्गावर आणण्याच प्रयत्न केला. दोषी लोकांचा कोणताही मुलाहिजा न ठेवता त्यांना योग्य ते शासन दिले. पण त्यांच्या असंतोषातून त्यांनी मला वेदना दिल्या. तरी मी माझ्यावर आणि माझ्या कार्यावर प्रेम करण्याऱ्या गुरुदेव कार्यकत्यांना सांगेन माझ्या जीवनातून उभे केलेल तत्त्वज्ञान तुम्ही विद्यार्थ्यापर्यंत रुजविण्याचा प्रयत्न करा. त्यांच्यातील परमेश्वरी अंश जागा करण्यासाठी प्रयत्नशील राहा. मानवी संस्कृती रानटी अवस्थेत जाणार नाही याची काळजी घ्या. सामाजिक बांधिलकी शिक्षकाने कदापि विसराता कामा नये. संस्था समर्थ राहाण्यासाठी कार्यक्रत्यात एकसंघतेची भावना असणे गरजेचे आहे. संस्था ही केंद्रबिंदु असण्याची दृष्टी असली पाहिजे. त्यागातूनच जग समृध्द होत जाते. भोगातून ते दारिद्री होत जाते हा जीवनचा सिध्दांत आहे. श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेला या भारत मातेची नम्रतेनं सेवा करायची आहे. सामान्य समाजाची शिक्षणद्वारा ही सेवा करायची आहे. त्यासाठी महान चेतना आमच्या पाठीशी असावी. हे बापूजीचे विचार एका सारसंग्रहात्मक तत्ववेत्याचे विचार असलयाचे दर्शक आहे. संस्थेच्या पाठीशी लोकसेवा करण्यासाठी जी महान चेतना उभी आहे ती म्हणजे बापूजींचा विचार, त्यांची श्रध्दा, त्यांच्या त्याग, त्यांची सत्यनिष्ठा ज्ञान निष्ठा, त्यांच पावित्र जीवन. हेच बापूजींच्या विचारांच, कृतीच आणि जीवनाच "सारसंग्रहात्मक तत्त्वज्ञान" आहे.

**संदर्भ :**

1. सुरवसे गजानन, **बापूजी साळुंखे व्यक्ती आणि कार्ये**. कोल्हापूर : शिक्षण महर्षी बापूजी साळुंखे छटाब्दीपूर्ती समिती
2. साळूंखे प्रकाश रामचंद्र, **ज्ञानेय.** कोल्हापूरः प्रकाशक कार्याध्यक्ष स्मारक समिती
3. प्रकाशक डुके एन.के., **स्मरणिका.** साताराःकार्यवाहक जन्मछटाब्दी स्मारक समिती
4. कर्मविर बापूजी साळूंखे गौरव अंक, 1976